पैसा म्हणजे काय ?

... चन्द्रशेखर पुरन्दरे

कल्याणकारी कार्यासाठी राष्ट्र–राज्याची जरुरी राहणारच. जोपर्यंत गरीब आहेत, तोपर्यंत राष्ट्र–राज्य लागणार, मग ते कितीही अक्षम, भ्रष्टाचारी असो. शाश्वत पर्यायी विकासापुढे हे मोठे आव्हान आहे – अशा राष्ट्र–राज्याला पर्याय देणे. राष्ट्र–राज्य आणि त्याची दमनशाही बळकट करणाऱ्या उजव्या व अदूरदर्शी डाव्या शक्ती प्रबळ आहेत. तशाच आंतरराष्ट्रीय वित्तासंस्थाही. पर्याय या सर्वांना असायला हवा.

प्रस्तावना व लेखाची मांडणी :

भारतीय संदर्भात बहुतेक जनआंदोलने मुख्य प्रवाहाच्या विकासाच्या सध्याच्या प्रारूपाविरुद्ध उभी राहताना दिसतात. पर्यावरणाला हानिकारक ऊर्जा–स्रोतांचे प्रकल्प, औद्योगिक प्रकल्प, कसत्या जमिनीवरच्या खाणी, पर्यटनस्थळे असे प्रकल्प व यांना संमती देणारे राष्ट्र–राज्य, त्यामागचा आंतरराष्ट्रीय बाजार व वित्त–संस्था इत्यादी या प्रारूपाचे घटक आहेत. त्या अंतर्गत अनेकांची पारंपारिक उपजीविकेची व्यवस्था व ज्ञानव्यवस्था हिरावून घेतली जात आहे किंवा सरळ नाकारली जात आहे. आंदोलने या आक्रमित जगाच्या अस्तित्वाच्या हक्कांसाठी पुढे येतात.

ही दोन जगे वास्तव आहेत. मुख्य प्रवाहाचे रूप समोर दिसते आणि त्याचे झालेले किंवा होणारे बळीही समोर दिसतात. लवासाचे बांधकामही दिसते आणि उद्याचे विस्थापितही दिसतात. या दोन जगांखेरीज एक मायावी जगही अस्तित्वात आहे. फक्त पैशाच्या उलाढालीची तुलना केली तर हे जग मुख्य प्रवाहाच्या वास्तव जगाहून कित्येक पटींनी मोठे असते. पैशातून पैसा मिळवणारे हे जग वैध आहे, गतिमान आहे, बहुधा राष्ट्र–राज्याच्या सीमा न मानणारे आहे आणि बहुशः पडद्याआड आहे. वित्तबाजारातील वित्तीय मूल्ये यांचे हे जग आहे. त्याची ओळख लेखावरून व्हावी. हे मायावी जग वास्तव जगाचे रूप उत्तरोत्तर चढत्या प्रमाणात ठरवत आहे.

लेखात प्रथम तत्त्वज्ञान व इतर समाजशास्त्रे यांच्या पैशावरील आजवरच्या चिंतनाचा आढावा आहे. मग सद्यःस्थिती म्हणजे जागतिकीकरण, वित्तसंस्था, राष्ट्र–राज्य आणि बाजार, पैशाचे मायावी जग यांचे विवेचन आहे. शेवटी पैशाचे उद्याचे स्वरूप नोंदले आहे.

तत्त्वज्ञान आणि पैसा :

ॲरिस्टॉटलपासून म्हणजे अडीच हजार वर्षांपूर्वीपासून तत्त्वज्ञानाने पैशाचे स्वरूप समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

ॲरिस्टॉटलचे पैशाचे विवेचन नैतिकही आणि आर्थिकही आहे. पैशाच्या या दोन भूमिकांमध्ये संघर्ष होतो. तो संघर्ष आजही चालू आहे. नैतिकतेच्या कसोटीवर ॲरिस्टॉटलला पैसा साधन म्हणून मान्य आहे. म्हणजे, माणसाच्या किमान गरजा भागवायला लागणाऱ्या गोष्टी विकत घेण्यासाठी पैसा जरुरी असतो. त्यात पैसा साधन असतो, कारण गरज भागणे हा या व्यवहाराचा नैसर्गिक शेवट असतो. पण दलाली किंवा सावकारी करून पैसा मिळवणे यात पैसा हेच साध्य असते. पैशाचा असा वापर ॲरिस्टॉटलच्या मते नैतिक नाही. कारण दलाल स्वतःच्या उपभोगासाठी वस्तू विकत घेत नाही. पैसा ही वस्तू म्हणून वापरणे हा मुद्दा पुढे वित्तबाजाराच्या संदर्भात अधिक स्पष्ट होईल.

(एक लक्षणीय बाब इथे नोंदण्यासारखी आहे. कौटिल्याचे अर्थशास्त्र याच सुमारास

आले. त्यात चारही वर्णांची कर्तव्ये सविस्तर सांगितली आहेत. वैश्य व शूद्र यांच्या कर्तव्यांमध्ये व्यापाराचा समावेश आहे. म्हणजे ॲरिस्टॉटलला वाटतो तसा दलाली किंवा व्यापार कौटिल्याला अनैतिक वाटत नाही.)

या प्राचीन उल्लेखानंतर गेल्या दीड-दोनशे वर्षातील काही पाश्चात्य तत्त्वज्ञांचे चिंतन एकत्रित पाहू. ते म्हणजे मार्क्स(Marx), झिमेल(Simmel), वेबर(Weber), पार्सन्स(Parsons), हाबरमास(Habermas), बेकर (Baker), डॉड(Dodd), इन्गॉम (Ingham) इत्यादी.

झिमेलच्या मते जगातील कोणत्याही वस्तूचे दोन स्वतंत्र घटक असतात. एक - त्या वस्तूचे अस्तित्व, दोन - त्या वस्तूचे मूल्य. दोन्ही घटक तर्काच्या पलीकडचे आहेत. म्हणजे अस्तित्व, त्याचे ते सिद्ध करता येणार नाही किंवा मूल्यही त्याचे ते सिद्ध करता येणार नाही. मात्र एका वस्तूचे - 'पहिल्या' वस्तूचे - अस्तित्व व मूल्य गृहीत धरले की उरलेल्या सगळ्या वस्तूंचे अस्तित्व व मूल्य या पहिल्या वस्तूशी सापेक्षतेने सांगता येते.

म्हणजे तुलनेसाठी इतर वस्तू असतात तेव्हाच एखाद्या वस्तूची मागणी व मूल्य ठरते. (मागणीचा मुद्दा पुढे पाहू.) दुसऱ्या शब्दात - क्रमांक दोन असल्याखेरीज क्रमांक एक असूच शकत नाही. या वस्तूच्या मोबदल्यात ती वस्तू मिळू शकेल, हे परिमाण इतर वस्तूंमुळे शक्य होते.

'दुसऱ्याची' गरज असण्याचे कारण म्हणजे मानवी मन सतत द्वैतात अद्वैत व अद्वैतात द्वैत शोधत असते. त्यानुसार अस्तित्व व मूल्य यांची सांगड घातली जाते. (ही आध्यात्मिक पातळी फक्त उल्लेखिली.) मूल्य हा त्या वस्तूचा कधीच गुणधर्म नसतो. मूल्य नेहमीच व्यक्तिनिष्ठ असते. त्यामुळे एखादी वस्तू एखाद्याला बहुमूल्य वाटेल, तीच दुसऱ्याला कस्पटासमान वाटेल.

अस्तित्व-मूल्य या द्वैताबरोबरच व्यक्ती व वस्तू हे द्वैत मूलभूत आहे. 'मी' व्यक्ती आहे, या विधानातच मी एक वस्तू म्हणून स्वतःकडे पाहतो. एखाद्या वस्तूचे मी जसे निरीक्षण करू शकतो, ती समजावून घेऊ शकतो किंवा तिचे मापन करू शकतो, तसेच मी स्वतःबाबतही करू शकतो. एरवी 'मी' खेरीज इतर जगाशी कायम द्वैतात असणाऱ्यास 'माझ्या'त 'माझ्या'बाबत मात्र असे अद्वैत असते. कारण वस्तूही मी असतो आणि पाहणाराही मीच असतो. बाहेरच्या जगाशी असणारे द्वैत या अद्वैतामुळे स्वीकारता येते. (द्वैत या संकल्पनेला लागणारा बाहेरचा संदर्भ या अद्वैतामुळे मिळतो.) व्यक्ती व वस्तू हे द्वैत दोन टोकाच्या प्रसंगी विरघळू शकते. एक म्हणजे अगदी पाशवी कृत्यांमध्ये व दुसरे अति उच्च अनुभूतीमध्ये. 'बेभान' होऊन खून करणारा माणूस किंवा संगीत ऐकण्यात समरस झालेला माणूस - दोघांच्यातही व्यक्ती - वस्तू हा भेद संपलेला असतो. या मुद्याचाही उल्लेख केवळ झिमेलचा तात्त्विक विचार संपूर्ण करण्यासाठी केला. त्याच्या खोलात जाण्याची इथे जरुरी नाही.

व्यावहारिक पातळीवर एखादी वस्तू उपभोगासाठी मिळत नाही, तोपर्यंत ती हवीहवीशी वाटते. वस्तू व आपण यातील अंतर (मानसिक/आर्थिक/प्रत्यक्ष) कमी करण्याचा प्रयत्न त्या वस्तूचे मूल्य निर्माण करतो. व्यक्तिअंतर्गत हे अंतर ही इच्छा ठरते, तर व्यक्तीच्या बाहेर ते त्या वस्तूचे मूल्य ठरते. वस्तू प्राप्त होताच मूल्य नष्ट होते आणि वस्तू आर्थिक भूगोलाच्या बाहेर जाते. जोपर्यंत व्यक्ती-वस्तू हे द्वंद्व चालू असते, तोपर्यंत मूल्य अस्तित्वात राहते. उदाहरणार्थ, रोजच्या जीवनात एखादी गोष्ट सापडेनाशी झाली की तिची किंमत कळते, असे आपण म्हणतो.

काही गोष्टी मूल्यव्यवस्थेबाहेर असतात. जनआंदोलनांच्या तात्त्विक बैठकीसाठी त्या महत्वाच्या ठरतात. अशा गोष्टींना समाजाने मूल्य बहाल केलेले नसते. त्या मिळवण्याची इच्छा असली तरी त्या मुबलक उपलब्ध असल्या तर त्यांना मूल्य चिकटत नाही किंवा काही गोष्टी अशाही असतात, ज्यांना स्वयंभू मूल्य असते, पण त्यांची देवघेव शक्य नसते. मूल्य केवळ देवघेवीतून येते. या सामान्य,

व्यावहारिक अर्थकारणाबाहेर अशा वस्तू असतात. उदाहरणार्थ, सानेगुरुजींचा क्षमाशील स्वभाव. तो इतरांनी ओळखला किंवा ओळखला नाही, तरी तो स्वभाव शांतच राहतो. त्याला अंतर्भूत मूल्य असते. दुसरे उदाहरण म्हणजे निसर्ग, किंवा आजच्या शब्दांत पर्यावरण.

इन हवाओं का मोल क्या दोगे,
उन घटाओं का मोल क्या दोगे ?
अरे, इन जमीनों का मोल हो शायद
आसमानों का मोल क्या दोगे ?

अशा गोष्टी आपल्याकडून त्यांची नोंद मागतात. ही नोंद देण्याचा प्रयत्न पर्यायी विकास देतो, किंवा त्याच्याकडून ती अपेक्षा आहे. ही निराळ्या पातळीवरची नैतिकता आहे. ते मानवावरचे नैतिक बंधन आहे. त्यामुळे ती व्यक्ती-वस्तू या द्वैताबाहेर, परत आध्यात्मिक पातळीवर जाते. हा आध्यात्मिक पैलू रोजच्या जीवनात प्रवेशच करत नाही.

(हा विचार खरेतर सौंदर्यशास्त्राच्या जवळ जातो, माघाने शिशुपालवधात म्हटल्याप्रमाणे – **क्षणेक्षणे यत् नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः !** – प्रत्येक क्षणी नवीन आविष्कार दाखवणे हे सौंदर्याचे गमक आहे.)

दैनंदिन जीवनात एखाद्या वस्तूचे मूल्य अंशतः त्या वस्तूच्या मागणीवर ठरते. अनेकदा वस्तू मिळाली तर मिळणारे संभाव्य समाधान आणि वस्तू खरोखर मिळाल्यावर मिळणारे समाधान हे त्या विशिष्ट वस्तूवर अवलंबून नसते. ती गरज भागवणारी कोणतीही वस्तू चालू शकते. (भूक भागवणारा कोणताही खाद्यपदार्थ.)

(अगदी विरळा प्रसंगी एखादी विशिष्ट वस्तूच ती गरज भागवू शकते. तेव्हा त्या वस्तूचे मूल्य त्या व्यक्तीसाठी अतोनात वाढते. अशावेळी गरज वस्तू ठरवण्याऐवजी वस्तूच गरज ठरवते. उदा. एखादा विशिष्ट खाद्यपदार्थ.)

मूल्य ठरवणारा एक घटक म्हणजे टंचाई किंवा त्या संकल्पनेची दुसरी बाजू – मुबलक उपलब्धता. कोणत्याही वस्तूचे मूल्य या दोन टोकांच्या बिंदूमधील कोठलातरी बिंदू असतो. त्यात, आपल्याला विविधताही (choice याअर्थी) हवी असते आणि बदलही हवा असतो आणि हवी असलेली वस्तू ज्ञात संदर्भात बसणेही आवश्यक असते. हे दोन-तीन गुणधर्म असलेल्या वस्तूंना मूल्य प्राप्त होते. फक्त विविधता हवी म्हणून कझाकस्तानमधील घोड्याच्या मांसाचा पदार्थ सर्वसाधारण भारतीय निवडणार नाही. पण मोरोक्कोमधील चण्याच्या डाळीपासून बनवलेला पदार्थ निवडेल. कारण तो पदार्थ त्याला 'आपल्या' अमुक एका पदार्थासारखा वाटतो. त्यात विविधता, बदल आणि ओळख असे तीनही गुणधर्म असतात.

एखादी वस्तू बाजारात येते तेव्हा तिचे मूल्य व्यक्तीसापेक्ष न राहता बाजारातील इतर वस्तूंच्या तुलनेत ठरते. म्हणजे वस्तू 'स्वतंत्र' होते. ही वस्तू दुसऱ्या वस्तूच्या बदल्यात मालक बदलू शकतो. त्या वस्तूचे व्यक्तीनिष्ठ मूल्य पडद्यामागे जाते. (हा मुद्दा पुढे आंबे-कांदे या उदाहरणाने स्पष्ट होईल.) आर्थिक व्यवहार म्हणजे एक वस्तू मिळवण्यासाठी दुसऱ्या वस्तूचा त्याग करणे. त्यामागे वर सांगितलेले घटक असतात. वस्तूचे वस्तूपण वस्तूला वैधता देते. तिच्या व्यक्तीनिरपेक्षतेमुळे तिचे मूल्य ठरते म्हणजे – एखादी वस्तू मला विशिष्ट किंमतीला हवी असण्यावर तिचे मूल्य ठरत नाही, तर इतर त्यासाठी काय किंमत मोजतील यावर मूल्य ठरते.

वस्तू विकत घेण्याची क्रिया हे वैयक्तिक मूल्याचे वस्तुनिष्ठ मापन होते. विशेषतः १९व्या शतकापर्यंत व आजही फार मोठ्या प्रमाणात अर्थकारण फक्त उत्पादनाशी निगडित असल्याची समजूत

आहे. (त्यातील तज्ज्ञांच्या अशा गृहितांवर आधारित गणितांनी व बेभरवशाच्या भाकितांनी पश्चिमेला वेळोवेळी धोक्यात आणले आहे. उदाहरणार्थ, २०१२ साली युरोपची अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनुसार – ही या तज्ज्ञांनी संपृक्त झालेली जगातील शिखर संघटना आहे – किमान दोन टक्केने वाढायला हवी होती. प्रत्यक्षात वाढ सोडाच घटच दिसते आहे. हेच 'तज्ज्ञ' ब्रिटनची अर्थव्यवस्था २.६ टक्क्यांनी २०११ साली आणि २.८ टक्क्यांनी २०१२ साली वाढणार असे छातीठोकपणे सांगत होते. प्रत्यक्षात जेमतेम एखाद्या टक्क्याने वाढ झाली. त्याआधीही २००७ साली त्यांनी अशीच चूक केली होती. त्यावर ब्रिटनच्या राणीने २००८ साली नाराजीही व्यक्त केली होती.)

वस्तुतः अर्थकारणाच्या संशयास्पद आकडेमोडीबाहेरचा बृहत्समाजही अर्थकारण ठरवतो. (त्याकडच्या पद्धतशीर दुर्लक्षाने आज पश्चिमेत आर्थिक धोरणे फसलेली दिसतात.) त्यात उत्पादनाइतकेच देवघेवीलाही महत्व असते. यशस्वी देवघेवीत देणारा व घेणारा या दोघांच्याही समाधानात भर पडते. म्हणून जनआंदोलने असंतुलित देवघेवींवर प्रकाश टाकतात.

देवघेव नेहमीच स्थलकाल ठरवतो. भुकेने व्याकूळ झालेला माणूस भाकरीच्या तुकड्यासाठी रत्नही देईल. कारण त्यावेळी त्याच्यासाठी भाकरी बाजारात आलेलीच नसते. अशा प्रसंगात मूल्य 'नंतर' ठरवले जाते. ते गरजूच्या गरजेच्या तीव्रतेवर ठरते. अलीकडे चीनमध्ये अनेकपदरी महामार्गांवर ७–८ दिवसांचा ट्रॅफिक जॅम झाला. तेव्हा पाण्याच्या बाटल्या वाटेल त्या किंमतीला विकण्यात आल्या.

असे अपवाद सोडता, मूल्यामागे सामान्यतः नैतिकता असते. एखादी गोष्ट मिळविण्यासाठी चिकाटी, त्याग व परिश्रम करायला लागले तर त्यानंतर मिळणारे यश हे सहजसाध्य गोष्टींपेक्षा मूल्यवान समजले जाते. उदाहरणार्थ, ऑलिंपिकमधले सुवर्णपदक.

देवघेव असल्याखेरीज अर्थकारण जन्माला येत नाही, आर्थिक मूल्यही जन्माला येत नाही. पक्षी, मासे, जनावरे यांच्या खाण्यापिण्याच्या क्रिया आर्थिक व्यवस्थेत येत नाहीत किंवा एखादा माणूस कंदमुळे खाऊन जंगलात जगत असेल तर ती क्रियाही आर्थिक व्यवस्थेत येत नाही. पण तो कंदमुळांऐवजी काय खाऊ शकेल, हे अवधानात आले, तर कंदमुळांना मूल्य प्राप्त होते. वस्तू जर आपल्या व्यवहारात आल्या तरच त्यांना आर्थिक रूप येते. त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की वस्तू मिळाल्यावर मिळणारे समाधान तर्कदृष्ट्या वस्तू कशी मिळाली, यावर अवलंबून नसते. नैतिकदृष्ट्या असू शकेल. म्हणजे, या माणसाला कंदमुळे सहजासहजी सापडली, त्याने मोठ्या कष्टाने ती शोधली, त्याला ती कोणी फुकट दिली, त्याने खरेदी केली किंवा त्याने ती चोरली – यातल्या कोणत्याच पर्यायाने त्याचे समाधान कमी–जास्त होत नाही. पण सामाजिक संदर्भात चोरी ग्राह्य नसेल, तर त्याच्या मनात अपराधीपणा येऊ शकतो. मूल्य ठरवण्यामागे टंचाई व उपलब्धता या घटकांचा वरती उल्लेख केला. त्याबरोबरच उपयोगिता महत्वाची. पण केवळ उपयोगिता असेल तरी वस्तू देवघेवीपर्यंत पोचेल, म्हणजे आर्थिक क्षेत्रात येईल, असे नाही. गरीबी, आळस, वस्तू मिळण्याच्या अशक्यतेची जाणीव अशा अनेक कारणांनी उपयोगिता असूनही वस्तू मागणीपर्यंत येत नाही.

मूल्य ठरण्यासाठी तुलना असावी लागते, हे मघाशी म्हटले. तुलनेच्या शक्यतेच्या अभावी कितीही मागणी असली आणि कितीही दुर्मिळता असली तरी वस्तू अर्थक्षेत्रात येणार नाही. 'याऐवजी ते' हे अदलाबदलीचे तत्त्व, दोन मागण्यांमधील तुलनेची शक्यता दोन्हींचे मूल्य ठरवते. मूल्य या अमूर्त संकल्पनेचे पैसा हे मूर्त रूप आहे. पैशात किंमत करता येत असेल तरच मूल्य निर्धारित करता येते. किंमतीचा आकडा मूल्य आणि वस्तूच्या खरेदीने मिळणारे समाधान यांचे नाते नक्की करतो. (वस्तूच्या मूल्यामागे ती वस्तू निर्माण करण्यासाठीचे श्रममूल्यही असते. वर उल्लेख केलेल्या 'अंतर काटण्याच्या'

गुणधर्माबरोबर हाही घटक असतो. पण एखादी वस्तू विकाऊ ठरणार असेल तरच त्यामागच्या श्रमांना मूल्य लाभते. 'घरकामाला किंमत नाही' हे विधान हा गुणधर्म स्पष्ट करते).

पैसा दोन प्रकारे मोजता येतो. एक वस्तू विकत घेण्यासाठी – डझनभर केळी घ्यायला इतके रुपये लागतील किंवा पैसा आपलाआपलाही मोजता येतो. कर्जावरचे व्याज हे पैशाचे पैशात केलेले मोजमाप आहे. दुसऱ्या शब्दात – पैसा स्वतःसाठी नियम निर्माण करतो व ते पाळतो. कारण पैशाबाहेर त्याचे मोजमाप कसे करणार ?

एखाद्या वस्तूची किंमत वरखाली होते म्हणजे पैशाची किंमत कमी-जास्त झालेली असतेच असे नाही तर पैशाचे त्या विशिष्ट वस्तूशी असलेले नाते दोलायमान होते. त्या वस्तूची किंमत फक्त चढउतार दर्शवते. म्हणजे, पैसा वस्तूबाहेर व अलिप्त असतो. पैशाचा हा गुणधर्म महत्वाचा आहे. तो आर्थिक मूल्याच्या स्थैर्याशी निगडित असतो व आर्थिक मूल्याच्या स्थैर्यावर अर्थकारण अवलंबून असते.

पैसा जसा वस्तूबाहेर असतो, तसाच तो व्यक्तीबाहेर असतो. त्यामुळे परात्मता येते. (तिचा आढावा पुढे आहे.) व्यक्तीबाह्य जगाशी सक्तीच्या देवघेवीचे पैसा हे साधन झाले की तो स्वायत्त तर्काने जाणारा, अंकगणिताचे नियम पाळणारा व संपूर्णपणे व्यक्तीनिरपेक्ष साधन होतो. तो 'स्व'पासून पूर्णपणे विभक्त होतो आणि दोघांतील अंतर भरून काढता येत नाही. उपभोगासाठी (किंवा चैनीसाठी) वस्तू विकत घेण्यापुरताच पैसा व स्व यांचा संबंध येतो व विक्रयाबरोबर तो संबंध संपतो. कारण वस्तू स्वच्या मालकीची झाली की वर म्हटल्याप्रमाणे ती आर्थिक जगाबाहेर जाते.

एका विचारानुसार पैसा हा व्यावहारिक जगातील अस्तित्वाची प्रतिमा असतो. त्यामुळे (दोन्ही अर्थांनी!) सगळ्या गोष्टींना 'अर्थ' प्राप्त होतो. गोष्टींचे एकमेकांशी नाते त्यांचे अस्तित्व निश्चित करते. या विचाराने माणसा-माणसातील संबंध पैसा सगळ्यात शुद्ध रूपात स्पष्ट करतो. तो वैयक्तिक जगाच्या बाहेर राहतो व ऊर्वरित जगाशी संबंध ठेवायला व्यक्तीला मदत करतो. (किंवा टीकेच्या दृष्टीने भाग पाडतो !)

पैसा हे चलन होण्याआधी वस्तूंच्या अदलाबदलीने व्यवहार होत असत. तेव्हा विकणारा व विकत घेणारा या दोघांच्याही गरजा एकाचवेळी एकत्र येणे जरुरीचे असे. मला कांदे 'विकून' आंबे घ्यायचे असतील तर आंबे 'विकून' कांदे घेणारा मला तेव्हा भेटणे आवश्यक आहे. पैशाने ही 'तेव्हाच' भेटण्याची जरुरी राहात नाही. त्यामुळे देवघेवीतील वैयक्तिक सहभाग संपतो, मग परात्मता येऊ शकते, पण स्वातंत्र्यही मिळते. हे स्वातंत्र्य चार प्रकारचे असते. काय, कोणाकडून व केव्हा घ्यायचे हे तीन प्रकार आणि देवघेवीच्या शर्ती नाकारण्याचे चौथे स्वातंत्र्य.

पैशाच्या अलिप्तपणाचा मुद्दा विवाद्य आहे. मुळात पैशाचा उगमच जर भांडवलशाही व्यवस्थेतून होत असेल तर पैसा वापरणे हे भांडवलशाहीचे समर्थन होते. सामान्यतः भांडवलशाहीचे तर्कशास्त्र समाजातील तळागाळातील थर विचारात घेते, असे दिसत नाही. ग्राहक म्हणून अशा व्यक्तीचा उपयोग नसला (कोका कोला परवडतो का ?) तर भांडवलशाही त्याला माणूस म्हणून किंमत देऊ शकत नाही. पैसा हे चलन असले तरी त्याचवेळी अर्थ-सत्ताकारणाचे हत्यार असते. 'धनदांडगे' या शब्दांत हा भाव दिसून येतो. पैसा संपत्तीच्या मालकीतील, वाटपातील आणि सत्तेच्या सहभागातील विषमता वाढवतो.

त्यामुळे पैसा अलिप्त असतो, हे विधान मार्क्सला मंजूर नाही. त्याच्या मते पैसा हे सामाजिक नात्यांचे दृश्य रूप आहे आणि सामाजिक नातीच विषमतेवर आधारित आहेत. गांसमान (Gansmann) या दुसऱ्या एका विचारवंतानुसारही पैसा सामाजिक व आर्थिक दडपण निर्माण

करण्यासाठी, टिकविण्यासाठी व वाढवण्यासाठी वापरला जातो. जागतिक व्यवस्थेची केंद्र-परीघ अशी विभागणी करणारी विचारधारा मागच्या शतकाच्या उत्तरार्धात पुढे आली. त्यानुसार वस्तू, माणसे, सेवाक्षेत्र आणि पैसा यांच्या प्रवाहाची दिशा केंद्र-परीघ हे नाते ठरवते. उदाहरणार्थ - वसाहतवादादरम्यान अनेक पाश्चात्य राष्ट्रांनी वसाहतीतून कच्चा माल आपल्या देशात नेला, त्यावर प्रक्रिया करून उत्पादन केले व पैसा मिळवला, तो काही वसाहतीत परत आला नाही. त्यांतून आजचे विकसित जग हे केंद्र व आफ्रिका, आशिया हा परीघ निर्माण झाले. आज चीनही जागतिक केंद्रात दाखल झाला आहे. भारताचा काही भाग केंद्रात, बहुतांशी परिघावर आणि काही केंद्रापासून अधिकाधिक दूर जात आहे. (शरद जोशींचे इंडिया-भारत विभाजन).

समाजशास्त्रे व पैसा :

काही विचारवंतांच्या मते व्यक्तीचे समाजव्यवस्थेतील स्थान कमकुवत होणे हा आधुनिकीकरणाचा गाभा आहे. त्या अंतर्गत भांडवलशाहीला अनुकूल कायद्यांनुसार श्रम आणि भांडवल हे वैयक्तिक फायद्यांसाठी एकमेकांशी करार करण्यास 'मुक्त' असतात. या करारांबरोबर व्यक्ती व समाज यांतील परात्मतेला सुरुवात होते.

मार्क्स उत्पादनक्षेत्रात चार प्रकारची परात्मता सांगतो. निर्मितीपासून विभक्ती, उपजीविकेसाठी ती निर्मिती करायला लागणे, संपूर्ण क्षमतेतील अंशतः क्षमतेचा-बाजाराला उपयोग एवढ्याच क्षमतेचा-वापर आणि बृहत् समाजापासून या कामामुळे येणारे तुटलेपण. ज्यां बोद्रिया (Jean Baudrillard) या तत्त्वज्ञानुसार पैसा परात्मता वाढवतो. मध्यमवर्ग चंगळवाद आत्मसात करतो. पैशाने खरेदी केलेले माझे घर, गाडी, कपडे, यांवर समाजातील माझे स्थान ठरते. म्हणजे या वस्तूंचे प्रतीकमूल्य महत्वाचे होते. कारण या लोकांना जगण्याची निराळी पद्धत असू शकते, आपल्या किमान गरजांसाठी काय पुरेसे आहे, याचाच विसर पडलेला असतो. माणसेच प्रतीकमूल्ये असणाऱ्या वस्तू झाली आहेत. घर-गाडी-कपडे यांखेरीज मला अस्तित्वच राहिलेले नाही.

मग ही परात्मता न्याय्य आहे हे ठरवणारे तर्कशास्त्रही पुढे येते. (ते मानसिक गुलामगिरीचे तर्कशास्त्र). असे करार सतत चालू असतात. म्हणजे, ही एकदाच घडणारी घटना नसते, तर सतत चालू राहणारी प्रक्रिया होते. पैसा या कराराचा पाया असतो. पण कराराचे स्वरूप सतत बदलत असते. त्याचा तोटा, व्यवस्था व व्यक्ती दोघांनाही होतो. (व्यवस्था म्हणजे केवळ भांडवलशाही किंवा शासकीय संस्था नव्हे तर अशा संस्था व समाजाची मूल्यव्यवस्था मिळून व्यवस्था होते.) व्यक्तीच्या दृष्टीने पाहता, आजवरची त्या व्यक्तीची जडणघडण ज्या सामाजिक संस्कृतीत घडली, त्या संस्कृतीची शिकवण बदलत्या सामाजिक परिस्थितीला सामोरे जाण्यास अपुरी पडण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ - भारतातील आदिवासी-वनवासी त्यांच्या क्षेत्रावरील औद्योगिक अतिक्रमणापुढे हतबल झालेले दिसतात. त्याचवेळी व्यवस्थेच्या दृष्टीनेही हे करार फायद्याचे नसतात. कारण असे आर्थिक व राजकीय निर्णय समाजाच्या एकूण अनुभव-ज्ञान या मिळकतीवर आधारित असावे लागतात. तर ते स्थिर राहतात. त्यामुळे आपल्याशी संबंधित व्यक्तींची, उदाहरणार्थ एखाद्या अशा कारखान्याच्या कर्मचाऱ्यांची मानसिकता आपल्या आदर्शवादाला अनुकूल करण्याचा प्रयत्न केला जातो. ही मानसिक गुलामगिरी जेवढी सर्वसमावेशक होते, तेवढे व्यवस्थेचे स्थैर्य वाढते. ही गुलामगिरी पैशाचे आमिष व सत्तेची भीती यांमुळे शक्य होते. हा मुद्दा जरा खोलात पाहू. कारण तो जनआंदोलनांच्या कार्यपद्धतीशी जवळचा आहे.

सत्ता (power over या अर्थी) व्याख्येनुसारच दोन असमान पक्षात असते. दोन पक्षात आधी समानता असली तरी सत्ता असमानता निर्माण करते. सत्तेचे विकेंद्रीकरण या वाक्प्रचाराला तसा

अर्थ नाही. केंद्र सरकारने पाणीवाटपाच्या सत्ता राज्यसरकारकडे दिल्या तरी ज्यांच्यावर सत्ता राबवायची त्या लोकांच्यात व केंद्रात जी असमानता आधी होती, ती आता त्यांच्यात व राज्यसरकारमध्ये आली. विकेंद्रीकरण हा शब्द सक्षमीकरण (power to) या अर्थीही वापरला जातो. त्यामुळे हा संदेह निर्माण होतो. माझ्या मते, जनआंदोलने दुबळ्या स्तरांचे सक्षमीकरण (power to) करू पाहतात. कोणत्याही स्वरूपातील सत्ता कायमची नष्ट करणे हे त्यांचे अंतिम ध्येय असते. परत, माझ्या समजुतीनुसार हा शाश्वत विकासाचा अविभाज्य भाग आहे. (हे मत विवाद्य असू शकते.)

माझे प्रतिपादन असे की, सत्ता (power over) एकाचा फायदा व दुसऱ्याचा तोटा करते. त्यामुळे पैशावरच्या विश्वासापेक्षा सत्तेवरचा विश्वास अधिक दृढ व खोल असायला लागतो. तरच हे असंतुलित समीकरण मान्य होऊ शकते. पण सत्ताधाऱ्यांच्या आजवरच्या कर्तृत्वामुळे लोक त्यांच्यावर विश्वास टाकायला धजत नाहीत. त्यामुळे सत्तेला प्रत्येक निर्णयासाठी युक्तिवाद करायला लागतो. मग तो एसईझेड असो किंवा गाडगीळ समितीचा अहवाल फेटाळणे असो.

पैसा व सत्ता यांच्या विश्वासार्हतेतील फरक एका उदाहरणाने स्पष्ट व्हावा. मुंबईतील एका बिल्डरने जमीन बळकावली. या जमिनीवर झोपडपट्टी आहे. तिथे राहणाऱ्यांचा रुपया या चलनावरील विश्वास उडालेला दिसत नाही. विश्वास उडालेला असतो तो बिल्डरची तळी उचलणाऱ्या शासनावरून आणि राग असतो तो आर्थिक बळावर शासनाला वाकायला लावणाऱ्या बिल्डरवर.

चलनी पैशांचा व्यवहार त्यामानाने 'सरळ' असतो. पन्नास रुपयांचा शर्ट घ्यायचा की नाही हे मी ठरवतो. दुकानदाराने शर्टाची किंमत आधीच लावलेली असते. ती स्वीकारणे किंवा नाकारणे यात मला व त्याला दोघांनाही मोकळीक असते. पण सत्तेला आव्हान द्यायचे तर शिक्षेची शक्यता असते. चलन म्हणून रुपया भारतात कोठेही त्याच किंमतीला चालतो. त्यासाठी प्रत्येक वेळी पुरावा द्यावा लागत नाही. सत्तेचे तसे नाही. सत्ताधीश कायद्याच्या चौकटीत सत्तेवर आला असला, कायद्याप्रमाणे धोरणे राबवत असला तरी जनमानसात त्याला सार्वत्रिक मान्यता मिळतेच असे नाही. प्रस्तावनेत म्हटलेल्या झळ पोचणाऱ्या जगातर्फे लढणाऱ्या जनआंदोलनांचा सत्तेबाबत हा प्रमुख आक्षेप असतो.

जागतिकीकरण आणि पैसा :

गेल्या दीड-दोनशे वर्षातील वसाहतवाद व आत्ताचे जागतिकीकरण दोन्हीचा जन्म पश्चिमेत झाला व त्या प्रक्रिया जगभर पसरल्या. आज जागतिकीकरण तिसऱ्या जगातील अनेक देशांचे धोरण ठरवण्याइतके प्रबळ झालेले दिसते. या प्रक्रियेने तिसऱ्या जगातील आर्थिक व सामाजिक विषमता वेगाने वाढत आहे, याची जाणीव अत्यल्प प्रमाणात पश्चिमेत विचारवंतांत व उच्च मध्यमवर्गात होताना दिसते. त्याबरोबरच इथल्या पर्यायी विकासाच्या विचारधारेत हा महत्वाचा कार्यक्रम मानला जातो. ज्या अर्थकारणाचा भाग म्हणून जागतिकीकरण चालू आहे, त्यामागचे तर्कशास्त्रच दोषी असावे, असे प्रतिपादन आता सुरु झाले आहे. हे प्रतिपादन गांधीवादाकडे झुकते.

औद्योगिकरण-चंगळवाद वगैरे प्रकिया पर्यायी विकासाला मंजूर नाहीत, असे जेव्हा म्हटले जाते, तेव्हा हे संशयास्पद पाश्चात्य तर्कशास्त्र अभिप्रेत असते.

या तर्कशास्त्राचे सध्याचे परिणाम प्रथम अगदी विकसित देशात पाहू. तेथे एकामागून एक देश कर्जबाजारी, दिवाळखोरी या मार्गाने जाताना दिसतात. अमेरिका, ग्रीस, आयर्लंड, स्पेन ते अगदी फ्रान्सपर्यंत. त्यातल्या त्यात स्थिर ब्रिटनमध्ये राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा वेग ऋण नाही, याबद्दल इथले राजकारणी स्वतःची पाठ थोपटत आहेत आणि विकासाचे हे प्रारूप भारतात राबवले जात आहे. याचे प्रमुख कारण दिले जाते ते म्हणजे आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था आज कोणत्याच देशाच्या मर्यादा (सीमा) मानत नाहीत. त्या बेगुमानपणे त्यांचे प्राधान्यक्रम राबवत राहतील. या विधानाला फार अर्थ नाही.

कारण राष्ट्राचे सार्वभौमत्व अजून शाबूत आहे. भारतात एफडीआय मंजूर व्हायला शेवटी लोकसभा व राज्यसभा यांची मंजुरी लागलीच. म्हणजे आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांचा राष्ट्र-राज्य सीमांतर्गत प्रवेश दोन्ही पक्षांच्या संमतीखेरीज होऊच शकत नाही. (वसाहतवादाच्या यशाचेही कारण एतद्देशीयांच्या एका वर्गाचा त्याला पाठिंबा हे होते.) या संदर्भात चीनचे उदाहरण पाहण्यासारखे आहे. या वित्तसंस्थांचे व आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धोरण आपल्या देशाच्या धोरणाशी जोडून ३०-४० कोटी जनता अल्पावधीत चीनने दारिद्र्यातून वर आणली.

तत्त्वतः तरी आपल्या देशातील दुबळा स्तर सक्षम करणे हे राष्ट्र-राज्याचे आद्यकर्तव्य असते. पहिला मुद्दा म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा तो प्राधान्यक्रम असेलच, असे नाही किंवा असलाच तर त्या देशातील संभाव्य अराजक व्यापाराला घातक ठरेल इतपतच असेल. कारण अशा अराजकाने व्यापार अशक्य होईल, हा स्वार्थ. दुसरा मुद्दा म्हणजे आज वित्तसंस्थांचे विशेषतः बँकांचे व्यवहार इतक्या वेगाने, इतक्या मोठ्या प्रमाणात व इतक्या क्लिष्ट वित्तीय मूल्यात (गुंतवणुकीचे शेअर्ससारखे प्रकार) होत असतात की राष्ट्र-राज्य त्या देवघेवीतच अडकून पडलेले दिसते. या सततच्या देवघेवी आखलेल्या चौकटीत ढोबळ मानाने होतात, पण रोजचे निर्णय आंतरराष्ट्रीय राजकीय परिस्थिती, त्यांचे दबाव, देशांतर्गत राजकीय परिस्थिती, सरकारी व संबंधित वित्तसंस्थांचे अधिकारी यांच्या वैयक्तिक संबंधांवरही अवलंबून असतात. म्हणजे या देवघेवी पुस्तकी नियमांप्रमाणे होत नाहीत. उदाहरणार्थ 'आंदोलन'च्या सप्टेंबर २०१२ च्या अंकात London InterBank Offered Rate (LIBOR) च्या घोटाळ्याची नोंद आहे. LIBOR हा जागतिक प्रमाण असणारा व्याजदर आहे. त्यावर जगभरचे रोजचे आर्थिक व्यवहार चालतात. बँका एकमेकांना विनातारण कर्ज देतात. त्यासाठीही हा व्याजदर प्रमाण असतो. ही रोजची कर्जे कित्येक देशांच्या वार्षिक मिळकतीहून मोठी असतात. मोठ्या आंतरराष्ट्रीय बँका हा व्याजदर रोज ठरवतात. तो रोज सकाळी साडेअकरा वाजता लंडनमध्ये जाहीर होतो. सहा महिन्यांपूर्वी असे उघडकीला आले की, बँका संगनमताने हा व्याजदर कमी किंवा जास्त करत आहेत. तो वस्तुतः अर्थव्यवस्थेच्या निखळ आकडेवारीवरून ठरला पाहिजे. त्यात ढवळाढवळ होता कामा नाही. किंबहुना ती होत नाही, या विश्वासावर व्यवहार चालतो. पण ती ढवळाढवळ झाली. त्याला कारणे बँकांची नफेखोरी, त्या-त्या देशाची आंतरराष्ट्रीय बाजारातील पत ठरवण्याचे राजकारण अशी होती. म्हणजे हा वैयक्तिक भ्रष्टाचार नसून संस्थात्मक भ्रष्टाचार होता. ब्रिटनमधील अर्थमंत्रालयाचे उच्चपदस्थ, केंद्रीय बँकेचा उपाध्यक्ष व व्यापारी बँकांचे प्रमुख अधिकारी यांच्यातील त्यावेळच्या अनौपचारिक संभाषणातून व्याजदराचा कृत्रिम चढउतार ठरवून झाल्याचे उघडकीला आले. त्यात काही बँकांना काही कोटी डॉलर्स दंडही झाला. तीन अधिकाऱ्यांना डिसेंबरमध्ये अटकही झाली.

परिमाण म्हणून LIBOR चे महत्व बहुतेकांना माहीतही नसते. त्यावर आधारित अब्जावधी डॉलर्सची पैशाची उलाढाल जगात रोज होते, हेही माहीत नसते. हे प्रमाणच बदलणे म्हणजे वेळाचे किंवा अंतराचे प्रमाण गुपचूप बदलण्यासारखे आहे. एक मीटर हे अंतराचे किंवा लांबीचे प्रमाण आहे किंवा एक मिनिट हे वेळेचे प्रमाण आहे. समजा, ही प्रमाणे निर्धारित करणाऱ्या जागतिक संस्थेने मीटरची लांबी १०० सेंटीमीटर्सऐवजी ९९ सेंटीमीटर केली, तीही छुपेपणाने. पण जगभर अचानक ९९ सेंटीमीटर हेच प्रमाण अस्तित्वात आले, किंवा एक मिनिट म्हणजे ६१ सेकंद हे प्रमाण अंमलात आले तर किती क्षेत्रात किती गोंधळ होईल, हे कल्पनातीत आहे. तोच प्रकार LIBOR ठरविण्यात राजरोस काही वर्षे चालू होता.

दैनंदिन पातळीवर पाहता, समजा माझ्याकडे नवीन टीव्ही घ्यायला पुरेसे पैसे नाहीत, मग थोडे डिपॉझिट आणि उरलेले कर्ज मी काढतो. हे कर्ज जी संस्था देते, मग ते दुकान असेल, बँक

असेल, त्या कर्जाचा व्याजदर शेवटी या LIBOR वर अवलंबून असतो. LIBOR कृत्रिमपणे ठरवला गेला की मला माहिती नसतानाही काही हजार रुपयांचा भुर्दंड बसतो. तोही अधिकृतरीत्या. खासगी सावकाराने अवाच्या सवा व्याजाने कर्ज देणे वेगळे. माझी गरज भागवण्यासाठी मी ते उघड्या डोळ्यांनी घेतलेले असते, पण ज्या सरकारमान्य संस्था (राष्ट्रीयीकृत वा केंद्रीय बँका) माझ्या पैशाचा पाया असतात, त्यांच्याकडून हा विश्वासघात अपेक्षित नसतो. हा संस्थात्मक भ्रष्टाचार, धोरणातील लवचिकता, कायद्याला मुरड घालण्याची, वळसा घालण्याची संस्कृतीच झालेली दिसते. बँकांनी कसे वागावे याची पुस्तकी नियमावली कितीही सुस्पष्ट, निःसंदिग्ध व विस्तृत केली तरी वर म्हटलेली आर्थिक क्षेत्राबाहेरची परिस्थिती प्रत्यक्षातील धोरण ठरवते. पैशाला असणारे विश्वासाचे अधिष्ठानही यावरून लक्षात यावे. विश्वासाचा हा पदर आकड्यात मांडता येत नाही, त्यामुळे रूढ अर्थकारण तो लक्षातच घेत नाही. लक्षात घेतले जाते ते म्हणजे पैसा हे देवघेवीचे साधन आहे, मोबदला देण्याचे साधन आहे, व्यवहारातील एकक आहे आणि काही कालावधीनंतर त्याच किंमतीला परतफेड करण्याचा मापदंड आहे. ही प्राथमिक पाठ्यपुस्तकाची व्याख्या अजून प्रमाण धरली जाते. पण पैसा हा सत्तेचा भाग झाला की वरची चलनाला लागू असणारी व्याख्या अपुरी पडते. मग पैसा नियंत्रणाचे साधन होतो आणि लोकांवर हे नियंत्रण करणाऱ्या संस्था अस्तित्वात येतात.

पैसा हाताळणाऱ्या बँकांसारख्या संस्था बेजबाबदारपणे वागतात, हे LIBOR च्या उदाहरणात पाहिले. पण LIBOR सोडूनही इतर भ्रष्टाचार अवाढव्य प्रमाणात चालू असतो. काळा पैसा पांढरा करण्याबद्दल HSBC या आंतरराष्ट्रीय बँकेला डिसेंबरच्या मध्याला एक बिलियन डॉलर्सचा दंड झाला. पैसा हवा असणाऱ्या क्षेत्रांमध्ये राष्ट्र-राज्य गुणात्मक फरक करते व प्राधान्यक्रमाने सवलतीही पुरवते. काही देशांत उद्योगाला, काही देशांत सेवाक्षेत्राला तर काही देशांत शेतीला प्राधान्य दिले जाते. त्याबरोबरच संपत्तीच्या वाटपातही हा प्राधान्यक्रम येतो. व्यक्तीगत भ्रष्टाचार त्यात येतो. पण आंदोलने प्रामुख्याने चुकीच्या संस्थात्मक प्राधान्यक्रमाविरुद्ध निषेध नोंदवत असतात.

१९व्या शतकापर्यंत पैसा हे सामाजिक घडामोडींचे एक कारण मानण्यात येत असे. उदा. सरकारी आर्थिक धोरण. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून पैसा हा सामाजिक प्रवाहांचा परिणामही असतो, हा विचार पुढे आला, उदा. रोजगारात, मासिक वेतनात स्त्रीला त्याच कामाचा मोबदला पुरुषांपेक्षा कमी मिळतो. घरातल्या पैशाच्या वापरात पुरुषप्रधान ग्रामीण भारतीय संस्कृतीत पुरुष व मुलगे यांच्यावर स्त्रिया व मुली यांच्या मानाने जास्त खर्च होतो.

राष्ट्र-राज्य आणि बाजार :

खुली अर्थव्यवस्था म्हणजे राजकारण व बाजार यांची संपूर्ण फारकत. ही संकल्पनाही पश्चिमेतून आली. ती आदर्शवादी अशा अर्थी की ना ऐतिहासिक कालात ही फारकत शक्य होती ना अर्वाचीन काळात. त्यात पश्चिमेच्या दुटप्पीपणाला अनुसरून ही तात्त्विक फारकत पश्चिम त्यांच्या स्वतःच्या देशात राबवत नाही. किंबहुना ती राबवणे अशक्यच असल्याने आज इटली, ग्रीसची सरकारे नाक मुठीत धरून पैशाची याचना युरोपियन युनियनकडे करत आहेत. (डिसेंबर २०१२). पण उर्वरित जगासाठी मात्र तीच पश्चिम खुल्या अर्थव्यवस्थेचे पोवाडे गाते. बाजार म्हणजे काय ? त्यातल्या त्यात समावेशक व्याख्येनुसार अनेक वस्तू आपल्याला हव्या त्या किंमतीने हव्या त्या संख्येने जेथे विकल्या जाऊ शकतात, ती व्यवस्था म्हणजे बाजार. अशी व्यवस्था अस्तित्वात येण्यासाठी व्यक्ती-व्यक्ती किंवा व्यक्ती-संस्था किंवा संस्था-संस्था यांच्यातील लिखित वा अलिखित करार पाळले गेले पाहिजेत. तसेच त्या व्यक्तीचे किंवा संस्थेचे मालमत्तेचे अधिकार तहहयात अबाधित असले पाहिजेत.

तरच ती व्यक्ती किंवा संस्था त्या करारांना जबाबदार धरली जाऊ शकते. फक्त विकणारे व विकत घेणारे समोरासमोर असून चालत नाहीत. जगाच्या पाठीवर आज केवळ अफगणिस्तानात ही परिस्थिती आहे. तेथे राष्ट्र-राज्यच अस्तित्वात नाही. मग करार-मदार दूरच राहिले. दहशतवादी, अफूचे व्यापारी व साठेबाजी करणाऱ्यांची धन आणि गरिबांची परवड हा तिथला 'बाजार'.

म्हणजे संपत्तीच्या व सत्तेच्या वाटपाला अनुकूल समाजव्यवस्था जेथे शक्य आहे, तेथे 'मुक्त बाजार' (खऱ्या अर्थाने, आदर्शातील नव्हे) येऊ शकतो. मग राज्यव्यवस्था कशी आहे, हे महत्वाचे दिसत नाही. ती अमेरिकेसारखी भांडवलशाही-लोकशाही असेल किंवा चीनसारखी राष्ट्र-राज्य पुरस्कृत भांडवलशाही उमरावशाही-लष्करशाही असेल.

राष्ट्र-राज्य आणि बाजार सतत देवघेव करत असतात. (राष्ट्र-राज्य-वित्तसंस्थांप्रमाणे). ही देवघेव अंतर्गत व राष्ट्र-बाह्य प्रवाह, शक्ती यांच्या संदर्भात व प्रसंगी त्यांच्या दबावाखाली चालते. भारतासारख्या देशात विकसित, विकसनशील व अविकसित अशी तीनही जगे अस्तित्वात असल्याने प्रत्येक जगात देवघेव निराळी होते. सामान्यतः छोटा शेतकरी रोख पैशाचा वापर मर्यादित प्रमाणात करतो. औद्योगिक क्षेत्रात पैसा प्रामुख्याने उत्पादनासाठी वापरला जातो.

शहरी भागात लोकांची बदलती अभिरुची, प्रसारमाध्यमांचा कर्कश व सततचा चंगळवादी मूल्यांचा व वस्तूंचा गौरव, तंत्रज्ञान असे अनेक घटक एकत्र येतात. जसा एखाद्या समाजातील औद्योगिक किंवा सेवाक्षेत्राचा प्रभाव वाढतो (उदा. पश्चिम), तसे पैशाचे सांस्कृतिक रूप बदलते. ते केवळ किमान गरजा भागवण्यापुरते मर्यादित राहात नाही. ऋण काढून सण साजरा करण्याची वृत्ती वाढते. भारतातील आय.टी. क्षेत्रातील पंचविशीच्या पिढीत ही वृत्ती दिसून येते. आजच्या लाखाच्या पगारावर ६०-७० लाखांचे फ्लॅट, २५-३० लाखांची गाडी कर्जावर घेतली जाते. उद्या म्हणजे अक्षरशः उद्या नोकरी गेली तरी कर्ज मात्र पुढची २०-२५ वर्षे फेडायचे असते. अमेरिकेतील गृहकर्जाच्या प्रकरणात हेच झाले. बँकांनी धंदा वाढवण्यासाठी स्वस्तात कर्जे उपलब्ध केली. ज्यांना आयुष्यात कधी स्वतःचे घर घेणे शक्य नव्हते, त्यांनी तातडीने या कर्जावर घरे घेतली. पहिली दोन वर्षे सवलतीचा व्याजदर होता. लोकांनी हिशेब असा केला की या दोन वर्षात घराची किंमत वाढली की ते विकून आपल्याला परवडणारे कर्ज काढू व दुसरे घर घेऊ. प्रत्यक्षात घरांच्या किंमती खाली आल्या. दरम्यान कर्जाचा हप्ता परवडण्याबाहेर गेला. घराला खरेदीदारच नसल्याने ती विकली जाईनात. शेवटी बँकांनी या लोकांवर जप्ती आणून त्यांना बेघर केले. हीच परिस्थिती ब्रिटनमध्ये चार-पाच वर्षांपूर्वी आली होती. किंमती ठप्प झालेल्या आणि कर्जाच्या व्याजाचा मीटर चालू. त्यामुळे घर विकले तरी कर्ज फेडता येणार नाही, अशा ऋण-समभागात अनेक ब्रिटिश अडकले. मोठ्या प्रमाणावर कर्ज परत देणे थांबले तर ग्राहकांबरोबर बँकही धोक्यात येते. अमेरिका व ब्रिटन दोन्हीकडे अशा वेळी सरकारने लोकांना वाऱ्यावर सोडले आणि बँकांना वाचवण्यासाठी तिजोरीतून पैसा टाकला. अशीच परिस्थिती आता परत वर म्हटल्याप्रमाणे ग्रीस, इटलीबरोबर स्पेन, पोर्तुगालमध्ये आली आहे. सरकारने समाजसुरक्षा खर्च कमी करावा या आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या इलाजाने पहिला बळी समाजातील दुबळ्या स्तराचा जातो. पेन्शनर, वृद्ध, आजारी, बेरोजगार, एकट्या माता वगैरे. त्यामुळे लोक रस्त्यावर आले आहेत.

उद्याचा पैसा :

शेअर बाजारात फक्त कंपन्यांच्या शेअर्सचा व्यापार होतो असे नाही. (शेअर्स निदान वास्तव तरी म्हणता येईल. टाटा स्टील कंपनी अस्तित्वात असते आणि तिचे शेअर्स बाजारात विकायला किंवा विकत घ्यायला असतात.) अनेक नवी वित्तीय मूल्ये व्यापारासाठी नव्याने उपलब्ध

होत आहेत. ती जेवढी गुंतागुंतीची तेवढे त्यांचे वास्तवाशी नाते कमकुवत व प्रसंगी नसतेच (derivatives सारखी). त्यातील उलाढालीचा अंदाज द्यायचा झाला तर या ऑक्टोबरमध्ये फक्त मुंबई स्टॉक एक्स्चेंजमध्ये अशा शेअरखेरीज वित्तीय मूल्यांचा एक लाख कोटी रुपयांचा व्यापार झाला. (दुसऱ्या अंदाजानुसार चार लाख कोटी रुपये). विदेशी चलनाचा व्यापार हा अशा बाजाराचा एक छोटा भाग. डॉलरच्या दरात रुपयाच्या तुलनेने किती चढउतार होईल, अशासारखी ही सट्टेबाजी असते. यात रोजची उलाढाल जगात ३ ते ४ ट्रिलियन डॉलर्स होते. एक ट्रिलियन म्हणजे एकावर बारा शून्ये. म्हणजे वर्षाला फक्त विदेशी चलनाचा व्यापार हजार ते बाराशे ट्रिलियन डॉलर्स होतो. त्या तुलनेत संपूर्ण जगाची २०१० ची मिळकत फक्त ७० ट्रिलियन डॉलर्स होती. जगभरचा कच्चा माल व सेवाक्षेत्रे यांचा व्यापार याहूनही अगदी कमी होता. (२० ते २२ ट्रिलियन डॉलर्स) म्हणजे या हजार-बाराशे ट्रिलियन डॉलर्सच्या व्यापारातला नफाच जगाच्या संपूर्ण मालमत्तेहून काही पटींनी जास्त असावा. किंवा रॉयल बँक ऑफ स्कॉटलंडचा एक कर्मचारी रोज ३ ते ४ बिलियन डॉलर्सची सट्टेबाजी फक्त युरोबाँड या एका वित्त मूल्यात करतो. (एक बिलियन म्हणजे एकावर नऊ शून्ये). एवढा प्रचंड पैसा अगदी प्रामाणिक माणूस हाताळत असला तरी मानवी चुकीने एखादी बँक व तिचे ग्राहक सटकन दिवाळखोर होऊ शकतात. (असे प्रकार झालेले आहेत.)

अशी सोपी पैसा घरबसल्या, कायदेशीररीत्या मिळवण्याची नवीन दालने खुली होत आहेत. शेअर बाजारात माझी पत जर बऱ्यापैकी असेल तर गुंतवणूक न करता, किंवा मार्जिनची रक्कम भरून मी केवळ फोन आणि इंटरनेटवर हे व्यवहार करू शकतो. ५,००० रुपये मार्जिन लावून मी काही लाखांचा सट्टा करू शकतो. शहरी मध्यमवर्गाला ही रक्कम परवडण्यासाखी असते. सट्टा मनासारखा होत नाही म्हटले तर मी पाय काढून घेऊ शकतो. गेले तर पाच हजार जातात. पण सट्टा लागलाच तर कितीतरी जास्त फायदा होतो. जोपर्यंत पैसा शेअरबाजारात खेळत असतो, तोपर्यंत तो मायावी असतो. पण फायदा झाला की माझ्या खात्यात जमा होणारे पैसे खरे असतात. त्याचा व्यय वास्तव उपभोग किंवा गुंतवणुकीत झाला की विकासाचे रूढ प्रारूप अधिकच बळकट होते. म्हणून जनआंदोलनांनी मायावी जगाची दखल घेणे जरुरीचे आहे.

उद्याचा पैसा आणखी एका संभाव्य रूपात येऊ शकतो. वर उल्लेख केलेल्या इलेक्ट्रॉनिक पैशाने व त्याच्या सहजशक्य देशापार व्यवहाराने राष्ट्र-राज्याचे आर्थिक नियंत्रण कमकुवत होते. भविष्यात कदाचित राष्ट्रीय चलनच अनावश्यक होऊ शकेल. इंटरनेटच्या माध्यमामुळे जगभरच्या कष्टकऱ्यांना आपले श्रम जागतिक बाजारपेठेत विकणे सुलभ होईल व मोबदलाही आंतरराष्ट्रीय पातळीचा मिळेल. एकूण मानवी जीवनाचा स्तर उंचावला जाईल. आधीच्या उदाहरणांतील आंबे व कांदे यांची अदलाबदल त्वरित व (परत) पैशाखेरीज होईल. म्हणजे राष्ट्र-राज्याऐवजी इंटरनेट अधिक प्रभावी कल्याणकारी माध्यम ठरू शकेल.

सध्यातरी हा आशावाद कल्पनारंजन वाटतो. कारण अशी देवघेव वैध ठरवणारी यंत्रणा आवश्यक आहे. दुसरे म्हणजे राष्ट्र-राज्याचा विलय इतका सहजी होणार नाही. ते टिकवण्यामागे अनेक ताकदवान हितसंबंध आहेत. तिसरे म्हणजे कल्याणकारी कार्यासाठी राष्ट्र-राज्याची जरुरी राहणारच. जोपर्यंत गरीब आहेत, तोपर्यंत राष्ट्र-राज्य लागणार. मग ते कितीही अक्षम, भ्रष्टाचारी असो. शाश्वत पर्यायी विकासापुढे हे मोठे आव्हान आहे - अशा राष्ट्र-राज्याला पर्याय देणे. राष्ट्र-राज्य आणि त्याची दमनशाही बळकट करणाऱ्या उजव्या व अदूरदर्शी डाव्या शक्ती प्रबळ आहेत. तशाच आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थाही. पर्याय या सर्वांना असायला हवा.

परत, कल्याणकारी कार्याकडे वळल्यास असे दिसते की, त्या कार्यासाठी लागणारा पैसा

करामार्फत मिळतो. तोच स्रोत या प्रकारच्या देवघेवीने आटला तर सार्वत्रिक सुबत्तेपेक्षा सार्वत्रिक अराजक माजण्याचीच शक्यता जास्त आहे.

त्यातल्या त्यात शक्यतेच्या कोटीतील पैसा अनावश्यक करण्याचे प्रयोग अगदी लहान प्रमाणात झालेले आहेत. तेथे चलनावर नियंत्रण सामान्य माणसाचे – त्या समूहाच्या सभासदाचे – राहते, बँकेचे किंवा राष्ट्र–राज्याचे नाही. पैशाऐवजी असे 'सामाजिक धन' अस्तित्वात आले तर माणसाच्या अनेक सुप्त क्षमता बहरतील असा दावा करण्यात येतो. (मार्क्सच्या परात्मतेतील एक प्रकार). सध्याच्या बाजारधार्जिण्या व्यवस्थेत बाजाराला आवश्यक तीच क्षमता प्रकट होते, कारण तीच विकाऊ होते. बाकी क्षमता दबलेल्या राहतात. कवी आहे म्हणून बँक पतपुरवठा करणार नाही, कारकून आहे म्हणून करेल. बांगलादेशातील ग्रामीण बँकेच्या अनुषंगाने हा विचार जातो. अमेरिकेत Local Exchange Trading Schemes (LETS) म्हणजे पर्यायी स्थानिक चलन वापरण्याचे प्रयत्न झालेले आहेत. विकसित जगात सुमारे अडीच हजार ठिकाणी असे LETS चालू आहेत. ब्रिटनमध्ये ४५०च्या आसपास असावेत. त्यात सुमारे तीस हजार लोक सहभागी आहेत आणि या प्रयोगांची एकूण उलाढाल सुमारे २२ लाख पौंड असावी. म्हणजे हे फारच सूक्ष्म प्रमाण आहे. त्यातही बेरोजगार जास्त आहेत. स्वयंरोजगार करणारे (self-employed) व मध्यमवर्गीय थोडे आहेत. काही प्रमाणात बेरोजगारांना यातून मदत होते. पण कुशलता नसल्याने ते प्रामुख्याने शारीरिक श्रमांची व जास्त वेळ लागणारी कामे करतात. कारण मुख्यतः 'वेळ' हे चलन होते. बुद्धिजीवी माणसाकडे असणारी कुशलता, बाहेरच्या जगाचे ज्ञान व कॉम्प्युटरसारखी उत्पादनाची संसाधने या जोरावर ते कमी वेळ व कमी श्रम देऊन जास्त 'चलन' मिळवू शकतात. म्हणजे, वर्गभेद कमी होण्याऐवजी, वाढण्याचीच शक्यता दिसते.

हीच शक्यता capitalism over caste या अलीकडच्या, परत लहान प्रमाणावरच्या प्रकियेत दिसते. त्यात दलित उद्योजक पुढे आले व भांडवलशाहीचा वापर त्यांनी जाति–व्यवस्थेतून वर्गव्यवस्थेत वर जाण्यासाठी केलेला दिसतो.

निष्कर्ष :

पैशाच्या सांस्कृतिक पैलूंचा अंदाज या लेखावरून यावा. पैसा चलन म्हणून वावरतो. तो संस्कृतीचे प्रतिबिंब असतो आणि सत्तेचे साधनही असतो.

रूढ विश्लेषणाची द्वंद्वाधिष्ठित पद्धत पैशाचे सम्यक् आकलन व्हायला अपुरी वाटते. द्वंद्वाधिष्ठित पद्धत म्हणजे विचाराची नेटकी विभागणी. ती साध्य–साधन, आहे–रे–नाही–रे वर्ग, नैतिक–अनैतिक अशी द्वंद्वे गृहीत धरते. या अपुरेपणाचे एक कारण स्वाभाविक वाटते ते म्हणजे पैसा एकाच वेळी निराळी रुपे घेतो. दलालीमध्ये पैसा साध्य आहे आणि साधनही आहे, असे म्हणणे म्हणजे दलालीचे वर्णन झाले, त्यांतून दलालीच्या सामाजिक भूमिकेचा खुलासा होत नाही. तत्त्वज्ञान सोडता समाजशास्त्रांचे हे जन्मजात अधूपण आहे. विशेषतः मूल्यांचे व्यक्तीसापेक्ष व व्यक्तीनिरपेक्ष दुहेरी रूप समजायला द्वंद्वाधिष्ठित पद्धत अपुरी पडते. दुसरे कारण म्हणजे वर उल्लेख केलेली द्वंद्वे अस्थिर संकल्पनांवर आधारित आहेत. साधन हे नजीकचे साध्य म्हणता येईल आणि साध्य हे भविष्यातले साधन होऊ शकते. आहे–रे–नाही–रे वर्ग कायम सापेक्ष असतात. नीतिमत्ताही स्थलकालनिरपेक्ष नसते. पैसा त्यामानाने स्थिर असतो.

निम्बार्क भारतीय तत्त्वज्ञाने द्वैताद्वैत ही संकल्पना मांडली. म्हणजे द्वैत–अधिक–अद्वैत. लेखाच्या सुरुवातीचे झिमेलचे व्यक्ती आणि मूल्य याबाबतचे चिंतन ही पद्धत वापरते. पैशाचे आकलन व्हायला ती अधिक युक्त वाटते.

अमेरिकेचे एक माजी परराष्ट्रमंत्री हेन्री किसिंजर (शीतयुद्धाच्या संदर्भात) म्हणत असत –

आंतरराष्ट्रीय द्वंद्व सत्य-असत्यात नाही तर दोन सत्यात आहे. आंदोलने ज्यांच्या हक्कांसाठी उभी राहतात, ते पहिले सत्य. हे हक्क हिरावून घेणाऱ्यांचे दुसरे सत्य आणि पैशाच्या मायावी जगाचे तिसरे सत्य.

मयसभेत जमीन समजून दुर्योधन पाण्यात पडला. जमीन मायावी होती, पण दुर्योधनाचे पडणे वास्तव होते. मायावी जग व त्यातून निर्माण होणारा पैसा असे आहेत.

एक काल्पनिक प्रयोग करू. समजा, आंदोलनांच्या उपेक्षितांच्या जगाला या मायावी जगात आणले. एखादा प्रामाणिक संघटक व एखाद्या दात्याचे थोडेफार पैसे यायोगे हे शक्य झाले. संघटकांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक व्यवहार करण्यात आले व पैसा मिळाला. हा पैसा नैतिक का अनैतिक ते सांगणे कठीण आहे. अशी संदिग्धता रूढ गृहितांना आव्हान देते. मायावी जगात कोणाचेतरी शोषण झाल्याखेरीज संपत्ती निर्माण होणार नाही, हे इतक्या स्पष्टपणे म्हणता येणार नाही. एका दृष्टीने पाहता तर समाजातील दुबळ्या गटाने भांडवलशाहीतील वित्तीय मूल्ये आपल्या सक्षमीकरणासाठी (power to) वापरली असेही म्हणता येईल. (Capitalism over caste प्रमाणे)

हे एक उदाहरण झाले. मुद्दा हा की, व्यवस्थेचा निषेध, व्यवस्थेकडे मागण्या याबरोबरच आपल्या जगासाठी व्यावहारिक पर्याय आंदोलनांनी शोधणे असत्याचे वाटते.

टीप :

वास्तव्य भारतात नसल्याने माझे जनआंदोलनांचे आकलन फक्त पुढील तीन-चार स्रोतांवर आधारित आहे. 'आंदोलन'चे अंक, 'विद्रोही' या अनियतकालिकाचे अंक, भारतीय जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाची वेळोवेळी मिळणारी पत्रके व वर्षातून एक-दोनदा होणारा 'आंदोलन'च्या संपादकीय बैठकीतील सहभाग. या मर्यादेमुळे लेखातील जनआंदोलनांवरची काही निरीक्षणे अप्रस्तुत असू शकतात. तरीही आंदोलनांच्या अर्थकारणाची पूर्वपीठिका म्हणून लेखाचा उपयोग व्हावा.

काही प्रमुख संदर्भ :

- Aristotle on Money - Scott Meikle
- The Philosophy of Money - Georg Simmel
- The Nautre of Money - Geoffrey Ingham
- The Sociology of Money - Nigel Dodd
- The Sociology of Money - Wayne Baker and Jason Jimerson.
- कौटिल्य, मार्क्स, वेबर, बोद्रिया, हाबरमास वगैरे - इंटरनेट

- विशेष आभार : चारुता पारखी, नीलिमा क्षीरसागर

(या लेखातील चित्रे - चन्द्रशेखर पुरन्दरे)

चन्द्रशेखर पुरन्दरे

Email : **artnondeco@yahoo.co.uk**
Website : **www.art-non-deco.com**